# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** एम.आय.डी.सी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0262 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**21/04/2026 03:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 20/04/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 20/04/2026
**Time From (वेळेपासून):** 14:52 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 21/04/2026 **Time (वेळ):** 03:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 21/04/2026 03:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** छाया कडु देवरे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,एम.आय.डी.सी,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,एम.आय.डी.सी,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788215086

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती पुष्पावती सिताराम डेरे | | | 1. ग्रामपंचायत अधिकारी, कर्जुने खारे, ताजिअहिल्यानगर,, एम.आय.डी.सी,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | गौतम रामचंद्र सुर्यवंशी | | | 1. दिल्ली गेट, ताजिअहिल्यानगर, एम.आय.डी.सी,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

दि.20/04/2026

मी छाया कडु देवरे, वय 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.8788215086

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर 2024 रोजी पासुन कार्यरत आहे. दि.20/04/2026 रोजी आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना तक्रारदार महेश सुखदेव शिंदे यांनी आमचेषी संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळवुन तक्रारदार सदर लोकसेवक यांना दि.20/04/2026 रोजी दुपारी 14/00 वाजताचे सुमारास ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर येथे भेटणार असल्याचे कळविले. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार भ्रश्टाचार प्रतिबध कायदयानुसार गुन्हा होत असल्याने आम्ही त्यांना दि.20/04/2026 रोजी कर्जुने खारे येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर लागलीच आम्ही मा.कार्यकारी अभियता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेतले. त्याप्रमाणे दोन्ही पंच साक्षीदार हे ला.प्र.वि.अहिल्यानगर कार्यालयात हजर झाले. त्यानंतर आम्ही त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोका◌ॅ.सचिन सुद्रुक, पोका◌ॅ.वैभव सुपेकर, पोका◌ॅ.कुळधर यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाषी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवष्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिषी खाजगी वाहन क्र. एमएच 15 के सी 8517 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 13/00 वा. निघुन 13/45 वा. दरम्यान कर्जुन खारे, ता.जि.अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. तेथे तक्रारदार त्यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एम एच 16 एक्यु 4988 सह हजर होते.

आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. महेश सुखदेव शिंदे, वय-33 वर्षे, धंदा-शेती, रा.पानसंबळ वस्ती, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर, मो.नं. 7757964988 असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, " मी वरील ठिकाणी माझे वडील सुखदेव हेमाजी शिंदे, वय-66 वर्षे, आई हिराबाई सुखदेव शिंदे, वय-60 वर्षे, पत्नी सौ रोहिणी महेश शिंदे वय-26 वर्षे, मुली 1. शिवन्या महेश शिंदे , 2.अनन्या महेश शिंदे, असे एकत्र राहण्यास आहे. घरात मी मोठा मुलगा असल्याने घरातील सर्व महत्वाची कामे मी करत असतो.

सन 2023 साली प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत माझे वडील सुखदेव हेमाजी शिंदे यांनी त्यांचे नावे घरकुल योजनेअंतर्गत ग्रामपंचायत कर्जुने खारे, ता.जि. अहिल्यानगर येथे नाव नोंदणी केली होती. त्यानंतर 2024 मध्ये माझे वडीलांचे घरकुल योजनेत ऑनलाईन यादीमध्ये नाव आले त्यानंतर माझ्या वडीलांच्या स्टेट बँक ऑफ इडिया या बँक खात्यात प्रधानमंत्री आवाज योजना- ग्रामीण टप्पा -1 म्हणुन फेब्रुवारी 2026 मध्ये 15,000 रूपये अनुदान जमा झाले. त्यानंतर प्रधानमंत्री आवाज योजना-ग्रामीण टप्पा -2 मंजुर करणेकरीता मार्च/2026 मध्ये मी पुष्पा डेरे मॅडम, ग्रामसेविका, ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर यांची ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता.जि.

दि.२०/०४/२०२६

# फिर्याद

मी छाया कडु देवरे, वय ३७ वर्षे, व्यवसाय– नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.८७८८२१९५०८६

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर २०२४ रोजी पासुन कार्यरत आहे. दि.२०/०४/२०२६ रोजी आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना तक्रारदार महेश सुखदेव शिंदे यांनी आमचेशी संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळवुन तक्रारदार सदर लोकसेवक यांना दि.२०/०४/२०२६ रोजी दुपारी १४/०० वाजताचे सुमारास ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर येथे भेटणार असल्याचे कळविले. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयानुसार गुन्हा होत असल्याने आम्ही त्यांना दि. २०/०४/२०२६ रोजी कर्जुने खारे येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर लागलीच आम्ही मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेतले. त्याप्रमाणे दोन्ही पंच साक्षीदार हे ला.प्र.वि.अहिल्यानगर कार्यालयात हजर झाले. त्यानंतर आम्ही त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोकॉ.सचिन सुद्रुक, पोकॉ.वैभव सुपेकर, पोकॉ.कुळधर यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी खाजगी वाहन क्र. एमएच १५ के सी ८५१७ या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन १३/०० वा. निघुन १३/४५ वा. दरम्यान कर्जुन खारे, ता.जि. अहिल्यानगर येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. तेथे तक्रारदार त्यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एम एच १६ एक्यु ४९८८ सह हजर होते.

आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. महेश सुखदेव शिंदे, वय–३३ वर्षे, धंदा–शेती, रा.पानसंबळ वस्ती, कर्जुने खारे, ता. जि.अहिल्यानगर, मो.नं. ७७५७९६४९८८ असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, " मी वरील ठिकाणी माझे वडील सुखदेव हेमाजी शिंदे, वय–६६ वर्षे, आई हिराबाई सुखदेव शिंदे, वय–६० वर्षे, पत्नी सौ रोहिणी महेश शिंदे, वय–२६ वर्षे, मुली १.शिवन्या महेश शिंदे, २.अनन्या महेश शिंदे, असे एकत्र राहण्यास आहे. घरात मी मोठा मुलगा असल्याने घरातील सर्व महत्वाची कामे मी करत असतो.

सन २०२३ साली प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत माझे वडील सुखदेव हेमाजी शिंदे यांनी त्यांचे नावे घरकुल योजनेअंतर्गत ग्रामपंचायत कर्जुने खारे, ता.जि. अहिल्यानगर येथे नाव नोंदणी केली होती. त्यानंतर २०२४ मध्ये माझे वडीलांचे घरकुल योजनेत ऑनलाईन यादीमध्ये नाव आले त्यानंतर माझ्या वडीलांच्या स्टेट बॅक ऑफ इडिया या बॅक खात्यात प्रधानमंत्री आवाज योजना– ग्रामीण टप्पा –१ म्हणुन फेब्रुवारी २०२६ मध्ये १५,००० रूपये अनुदान जमा झाले. त्यानंतर प्रधानमंत्री आवाज योजना–ग्रामीण टप्पा –२ मंजुर करणेकरीता मार्च/२०२६ मध्ये मी पुष्पा डेरे मॅडम, ग्रामसेविका, ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर यांची ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर येथे जावुन भेट घेतली असता त्यांनी प्रधानमंत्री आवाज योजना–ग्रामीण दुसरा टप्पा मंजुर करणेकरीता माझेकडे १०,००० रूपये मागितले तसेच गौतम सुर्यवंशी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती, अहिल्यानगर हे माझेकडे माझे घराचे व्हिजिट साठी आले असता त्यांनी सुध्दा १०,००० रूपयांची मागणी केली आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.

तरी मी आज रोजी पुष्पा डेरे मॅडम, ग्रामसेविका व गौतम सुर्यवंशी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांची ग्रामपंचायत कर्जुने खारे, ता.जि. अहिल्यानगर येथे जावुन भेट घेणार असुन त्या दरम्यान प्रधानमंत्री आवाज योजना–ग्रामीण टप्पा –२ मंजुर होणेबाबत चर्चा करणार आहे त्यादरम्यान त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी.

तसेच पुष्पा डेरे मॅडम, ग्रामसेविका व गौतम सुर्यवंशी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचेत व माझेत कोणत्याही प्रकारचा अर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही. तसेच आमचेत कोणत्याही प्रकारचे भांडण अगर तंटा नाही. तसेच त्यांनी मागीतलेली लाचेची रक्कम मी माझ्या बचतीतील पैशातुन हजर करेल." अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार शिंदे यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेविका श्रीमती पुष्पा डेरे, ग्रामसेविका, कर्जुने खारे, ग्रामपंचायत, ता.जि.अहिल्यानगर व लोकसेवक गौतम सुर्यवंशी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती, ता.जि.अहिल्यानगर यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत

व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळविले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. शिंदे असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्ड केले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. १ यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून सदरचे रेकॉर्डर तक्रारदार श्री. शिंदे यांचे ताब्यात दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तकारदार हे पंच नं. १ यांचेसह तक्रारदार शिंदे यांच्या दुचाकी वाहनाने लोकसेविका श्रीमती पुष्पा डेरे व लोकसेवक गौतम सुर्यवंशी यांची भेट घेण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर येथे जाण्याकरीता १४/५२ वाजता रवाना केले. त्यानंतर १५/१० वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. १ आम्ही थांबलो त्या ठिकाणी परत आले. आमचे सुचनेप्रमाणे पोकॉ. सुद्रुक यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. १ वाकोडे यांना लोकसेविका श्रीमती पुष्पा डेरे व लोकसेवक गौतम सुर्यवंशी यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. २ यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होउन ग्रामपंचायत कार्यालय, कर्जुने खारे जवळ पोहोचलो. त्यानंतर आम्ही ग्रामपंचायती मध्ये गेलो. त्यावेळी कॅबीन मध्ये एक महिला बसलेली होती. तक्रारदार व सदर महिला यांचेत प्रधानमंत्री आवाज योजनेच्या दुस—या हप्त्याबददल चर्चा झाली. त्यावेळी माझे लक्षात आले की सदरची महिला हयाच लोकसेविका डेरे मॅडम आहेत. त्यानंतर सदर ठिकाणी एक इसम आले. त्यावेळी लोकसेविका डेरे मॅडम त्यांना म्हणाल्या की, झालं का. . हे म्हणतेत हप्ता नाही पडला, मी म्हणते हप्ता पडला नेमकं काय हे मंग..? त्यावेळी सदरचे इसम हे लोकसेविका डेरे मॅडम यांना म्हणाले की, हप्ते आताच नाही निघत.. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, सदरचे इसम हे लोकसेवक सुर्यवंशी आहेत. त्यावेळी तक्रारदार त्यांना म्हणाले की, तुम्ही पाठवलेत ना ..त्या दिवशी पुस्तक चेक करून आलो. आपलं झालयं का व्हय सर.. त्यावेळी लोकसेवक सुर्यवंशी म्हणाले की, **"तुम्ही ते करणार होते ना.. आमचे तुम्हाला म्हणलं होत ना.. ? त्यावर तक्रारदार त्यांना म्हणाले की, "आता तुम्हाला करायचं म्हणलं तुम्ही फोन केला मी नेमका त्या दिवशी बाहेर गेलो होतो. सांगा ना मॅडम तुम्ही त्यांना काय करायचं सांगा ना. ते म्हणु राहिले तेवढे दया मगं. एवढे कसकाय दयायचे..त्यावेळी लोकसेविका डेरे मॅडम म्हणाल्या की, "करा अॅडजस्ट.. तुम्ही काहीतरी करून टाका अन विषय मिटवुन टाका ना.. मी माझं काम करून समेत घालुन दिलयं तुम्ही बाकीच पहा आता.. त्यांच काही असेल ते मिटवुन टाका.. तुमच्या परस्पर काय करायचं ते करा.. अन मोकळे व्हा.. मी काही सांगणार नाही. मला का मधी घेता तुम्ही.. किती देणारेय..काय कस काय..?** त्यावेळी तक्रारदार त्यांना म्हणाले की, **"मग देतो ना..तुम्हाला ..त्यांना पाच न तुम्हाला पाच ..पाच हजार रूपये..त्यावेळी लोकसेविका डेरे मॅडम म्हणाल्या की, "मगं. परत देतान का...बाकीचे त्यावर तक्रारदार म्हणाले की, "मगं हप्ते आल्यावर देतो ना बाकीचे मगं...त्यावेळी लोकसेविका डेरे मॅडम म्हणाल्या की, "काय विषय नाही ना..? मी त्याला घाबरते...मला नाही काय..** त्यानंतर मी व तक्रारदार तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी परत आलो, अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रादार यांना घडलेल्या हकिगती विषयी विचारले असता त्यांनी पंच नं. १ यांनी सांगितलेल्या हकिगतीशी मिळती जुळती हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डर मधील तक्रारदार, लोकसेविका डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेविका डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचेकडे स्पष्ट लाचेची मागणी केलेली नसल्याने तक्रारदार यांना पुन्हा लोकसेविका डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांची भेट घेण्यासाठी ग्रामपंचायत, कर्जुने खारे येथे रवाना करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून सदरचे रेकॉर्डर तक्रारदार श्री. शिंदे यांचे ताब्यात दिला. आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदार हे पंच नं. १ यांचेसह तक्रारदार शिंदे यांच्या दुचाकी वाहनाने लोकसेविका डेरे व लोकसेवक गौतम सुर्यवंशी यांची पुन्हा भेट घेण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर येथे जाण्याकरीता १५/४१ वाजता रवाना केले. त्यानंतर १५/५९ वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच नं. १ आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकॉ. सुद्रुक यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. १ यांना लोकसेविका डेरे व लोकसेवक गौतम सुर्यवंशी यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. २ सोनमाळी यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होउन ग्रामपंचायत कार्यालय, कर्जुने खारे जवळ पोहोचलो. त्यानंतर आम्ही ग्रामपंचायती मध्ये गेलो. त्या **ठिकाणी लोकसेविका डेरे मॅडम व लोकसेवक सुर्यवंशी हे हजर होते. त्यावेळी लोकसेवक सुर्यवंशी तक्रारदार यांना म्हणाले की, "मला परत बोलावलं मॅडमला म्हणलं मी नाही येत पण ते कैलासचा त्यांचा फोन आला ते म्हणे मग आलो परत.. मग आलो परत जाव दे म्हणलं...त्यावेळी तक्रारदार त्यांना म्हणाले की, "मॅडमनी सांगितलं का तुम्हाला...मॅडमनी सांगितलं का तुम्हाला..? त्यावेळी लोकसेवक सुर्यवंशी त्यांना म्हणाले की, त्यांना दहा दयायचे पुढचा हप्ता आल्यावर मला पुढची प्रोसेस करायला आस हे ते ठरलं होत..त्यावेळी तक्रारदार शिंदे**

त्यांना म्हणाले की, "ऐका ना मी काय म्हणतो तुम्हाला पाच देतो...पाच हजार रूपये तुम्हाला देतो... त्यावेळी लोकसेवक सुर्यवंशी म्हणाले की, "कधी..? त्यावर लोकसेविका डेरे मॅडम म्हणाल्या की, "मिटल का...? त्यावेळी तक्रारदार त्यांना म्हणाले की, ऐका ना मॅडम तुम्हाला पाच हजार देतो अन त्यांना पाच हजार रूपये देतो.आता पैसे तर पाहिजे ना माझेकडे अॅडजस्ट करायला पाहिजे तुम्ही बघा ना माझेकडे ...त्यावर लोकसेवक सुर्यवंशी म्हणाले की, "चौथा हप्ता पडला तरच दहा हजार रूपये दे...त्यावेळी लोकसेविका डेरे मॅडम म्हणाल्या की, दया तेवढं देवुन टाका...पह्य मग अस हायं बाकी काय.. देतो म्हणतेत ते देताहेत...त्यावर तक्रारदार म्हणाले की, "अहो... शंभर टक्के तुम्हाला काय... त्यावेळी लोकसेविका श्रीमती डेरे तक्रारदार यांना म्हणाल्या की, "तुमच्यामुंळ मी मध्यस्थी केली.. त्यावेळी लोकसेवक सुर्यवंशी तक्रारदार यांना म्हणाले की, "होय... काय करायचं लवकर सांगा..त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, "मग मला सांगा ना तुम्ही कस करू काय हे मग आता हे माझ्याकड हाय तेवढे अॅव्हेलेबल आहेत...दया ना मग जातो मी पण तेवढया कामासाठी कशाला करतो व्यवहार...त्यावेळी लोकसेवक सुर्यवंशी म्हणाले की, "मी किती घेवुन येवु ते सांगा..? त्यावर लोकसेविका डेरे मॅडम म्हणाल्या की, पाच पाच घ्यायचे ना... त्यावर लोकसेवक सुर्यवंशी त्यांना म्हणाले की, "मी माझे पाच घेतो न जातो तुम्हाला आणुन देईल तो नाहीतर तुम्ही पण चला माझ्यासंग तिकडंच घेवु अन जावु चला... त्यावर तकारदार म्हणाले की, "आलो मी घेवुन... त्यानंतर मी व तक्रारदार तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी परत आलो, अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रादार यांना घडलेल्या हकिगती विषयी विचारले असता त्यांनी पंच नं. १ यांनी सांगितलेल्या हकिगतीशी मिळती जुळती हकिगत सांगितली. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डर मधील तक्रारदार, लोकसेविका डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेविका डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचे वडीलांच्या नावावर असलेल्या घरकुल साठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण दुसरा टप्पा मंजुर करणेकरीता १०,००० रुपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले.

आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन १००००/— रक्कम त्यात ५०० रुपये दराच्या २० भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोऱ्या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. २ यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकॉ.सुद्रुक यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवश्यकत्या सुचना दिल्या व तक्रारदार यांना कळविले की, त्यांनी ग्रामपंचायत कर्जुने खारे येथे जावुन लोकसेविका डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांची भेट घ्यावी. लोकसेविका श्रीमती डेरे किंवा लोकसेवक सुर्यवंशी यांनी लाचेची रकमेची मागणी केल्यास पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम त्यांना दयावी व लाच स्विकारले नंतरचा इशारा करावा अशा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांचे ताब्यात दिले. तक्रारदार व पंच नं. १ यांना लोकसेविका डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने १६/१७ वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना होवुन ग्रामपंचायत, कर्जुने खारे कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तक्रारदार व पंच नं. १ असे वाहनावरून उतरुन ग्रामपंचायत कार्यालयामध्ये गेले. थोडयावेळाने तक्रारदार यांना नेमुन दिलेला इशारा न करता बाहेर आले...त्यावेळी आम्ही सर्वजण सुरक्षित ठिकाणी गेलो त्यानंतर आमचे सुचनेवरून पोकॉ.सुद्रुक यांनी तक्रारदार यांचे ताब्यातील रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यावेळी आम्ही पंच नं.१ यांना रवाना केलेपासुन हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की, आपण आम्हाला तक्रारदार यांचे मोटारसायकलने रवाना केल्यानंतर आम्ही ग्रामपंचायत कार्यालय, कर्जुने खारे येथे गेलो सदर ठिकाणी लोकसेविका श्रीमती डेरे मॅडम हजर होत्या त्यावेळी तक्रारदार त्यांना म्हणाले की, पैसे... ? त्यावेळी लोकसेविका श्रीमती डेरे मॅडम त्यांना म्हणाल्या की, त्यांना दिले का..? एवढा वेळ का बरं लावला त्यांनी फोन लावला देत नाही म्हणे म्हणुन...थांबा बरं.. लोकसेविका श्रीमती डेरे मॅडम यांनी लाच रक्कम स्विकारली नाही त्यामुळे आम्ही आपण थांबलेल्या ठिकाणी आलो व वरील प्रमाणे आपण घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार श्री शिंदे यांनी लोकसेवक सुर्यवंशी यांचेबाबत माहिती घेतली असता लोकसेवक सुर्यवंशी हे निमगांव घाणा शिवारात असलेबाबत समजले. त्यामुळे तक्रारदार व पंच नं.१ यांना निमगावं घाणा येथे रवाना करण्याचे ठरले. त्यानंतर पंच नं.१ व तक्रारदार यांना मोटार सायकलने रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं.२ व सापळा पथकातील कर्मचारी असे खाजगी वाहनाने निघालो. निमगाव घाणा शिवारात आल्यानंतर लोकसेवक सुर्यवंशी थांबलेल्या ठिकाणापासुन काही अंतरावर येवुन थांबलो त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांच्या ताब्यात दिला व लोकसेवक सुर्यवंशी यांची भेट घेण्यासाठी रवाना केले ती वेळ १६/४७ वाजताची होती. त्यानंतर आम्ही आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी

त्यांना ठरवुन दिलेला लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा १६/५० वा. दरम्यान केला. लागलीच आम्ही पंच नं. २ व सापळा पथकासह जावुन तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले व तक्रारदार यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता तक्रारदार यांनी समोरील इसमाकडे बोट दाखवुन सांगितले की, हे लोकसेवक सुर्यवंशी आहेत मी लाचेची रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी ती त्यांचे उजव्या हाताने स्विकारून मी मोजुन घेतली व त्यांच्या हातातच ठेवलेली आहे. त्यानंतर आम्ही सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव गौतम रामचंद्र सुर्यवंशी, वय–४७ वर्षे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती, अहिल्यानगर, रा.देशमुख गल्ली, शमी गणपती मंदिरापाठीमागे, दिल्ली गेट, ता.जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक सुर्यवंशी यांचे हातात असलेली लाचेची रक्कम पंच नं.२ यांचेकरवी ताब्यात घेवुन त्यामध्ये लाचेच्या नोटा असल्याची खात्री केली. त्यानंतर आम्ही लोकसेवक सुर्यवंशी यांना खाजगी वाहनात सोबत घेवुन सापळा पथकासह लोकसेविका श्रीमती डेरे मॅडम यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेतले व त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती पुष्पावती सिताराम डेरे, वय–५० वर्षे, ग्रामपंचायत अधिकारी, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर, रा. नवोदय रोड, टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यानंतर आम्ही त्यांचेसह पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्याकरीता ला.प्र.वि.कार्यालय, अहिल्यानगर येथे आलो. आमचे पाठोपाठ तक्रारदार ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे आले. तेथे आम्ही आमच्या कक्षात लोकसेवक सुर्यवंशी यांच्या हातांची व कपडयांची अंधारात अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता, लोकसेवक सुर्यवंशी यांच्या दोन्ही हातांच्या तळहातास व बोटांच्या पेऱ्यांना अ‍ॅन्थ्रासिन पावडरची निळसर पांढऱ्या रंगाची चकाकी दिसुन आली. त्याबाबतचे फोटोग्राफस् घेण्यात आले. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय, अहिल्यानगर येथे पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले.

तरी दिनांक २०/०४/२०२६ रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान १४/५२ ते १५/१० व १५/४१ ते १५/५९ वाजेच्या दरम्यान ग्रामपंचायत, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर येथे लोकसेविका श्रीमती डेरे व लोकसेवक सुर्यवंशी यांनी तक्रारदार श्री. शिंदे यांचेकडे त्यांच्या वडीलांच्या नावावर असलेले घरकुलासाठी प्रधानमंत्री अवास योजनेचा (ग्रामीण) दुसरा हप्ता मंजुर करणेकरीता १०,०००/–रुपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच लोकसेविका श्रीमती डेरे यांनी लोकसेवक सुर्यवंशी यांना लाच देण्यासाठी तक्रारदार श्री शिंदे याना प्रोत्साहन देवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केल्याने व १६/४७ ते १६/५० वा. दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी लोकसेवक सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांचेकडुन १०,०००/– रु. लाचेची रक्कम स्विकारली आहे. म्हणुन यातील १) लोकसेविका श्रीमती पुष्पावती सिताराम डेरे, वय–५० वर्षे, ग्रामपंचायत अधिकारी, कर्जुने खारे, ता.जि.अहिल्यानगर, रा.नवोदय रोड, टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर २) गौतम रामचंद्र सुर्यवंशी, वय–४७ वर्षे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती, अहिल्यानगर, रा.देशमुख गल्ली, शमी गणपती मंदिरापाठीमागे, दिल्ली गेट, ता.जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

( छाया देवरे )
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,अहिल्यानगर

content.xmlPK □□p ,

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

MANIK BHAUSAHEB CHAUDHARI(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** MANIK BHAUSAHEB
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**